दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार , दि. १६ मार्च, २०२६ | वर्ष - १ अंक - १७० पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

सोमवार दि. १६ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष द्वादशी सकाळी ९-४१ पर्यंत
दिवस नक्षत्र-धनिष्ठा रात्री (पहाटे पर्यंत) ६-२२ पर्यंत, चंद्र रास- मकर संध्याकाळी ६-१४ पर्यंत, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### पोलिसांची धडक कारवाई

**पुणे**: स्वारगेट चौकातील बेशिस्त वाहतूक आणि अवैध रिक्षा थांब्यांमुळे होणारी कोंडी फोडण्यासाठी वाहतूक शाखेने धडक मोहीम हाती घेतली आहे. गेल्या दोन दिवसांत स्वारगेट वाहतूक विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभागाने केलेल्या संयुक्त कारवाईत ३७५ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केली असून, १० सदोष रिक्षा जप्त केल्या आहेत. या धडक मोहिमेमुळे स्वारगेट चौकाने मोकळा श्वास घेतला आहे.

## बंगालसह तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी येथे मतदान

# पाच राज्यांच्या विधानसभेची तारिख जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : भारतीय निवडणूक आयोगाने पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या पाच विधानसभांतील एकूण ८२४ जागांसाठी एप्रिलमध्ये टप्प्याटप्प्याने मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होईल.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी रविवारी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, या निवडणुकांमध्ये सुमारे १७.४ कोटी मतदार मतदानासाठी पात्र असून २.१९ लाख मतदान केंद्रांवर सुमारे २५ लाख निवडणूक कर्मचारी तैनात राहणार आहेत. आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी येथे ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. तामिळनाडूतील सर्व २३४ विधानसभा मतदारसंघांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. राज्यातील २९४ मतदारसंघांपैकी १५२ जागांसाठी २३ एप्रिल रोजी तर उर्वरित १४२ जागांसाठी २९ एप्रिल रोजी मतदान होईल. सर्व राज्यांतील मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, या राज्यांतील प्रत्येक मतदान केंद्रावर सरासरी ७५० ते ९०० मतदार असतील. मतदार यादीच्या अलीकडील विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करत मुख्य निवडणूक आयुक्तांनी बूथ लेव्हल अधिकारी आणि इतर निवडणूक कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सलग चौथ्यांदा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहेत, तर भाजप तेथे सत्ता मिळवण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी करत आहे. मतदार यादीच्या पुनरावृत्ती प्रक्रियेवरून ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगावर तीव्र टीका केली असून हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयातही गेला आहे.

तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक आघाडी पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. अण्णाद्रमुक-भाजप आघाडी त्यांना आव्हान देत आहे. याशिवाय अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाच्या प्रवेशामुळे निवडणुकीत नवा राजकीय रंग चढला आहे. केरळमध्ये डावे आघाडी आणि काँग्रेस नेतृत्वाखालील आघाडी यांच्यात पारंपरिक लढत होणार आहे. मुख्यमंत्री पिनारायी विजयन सलग तिसऱ्यांदा सत्ता राखण्याच्या प्रयत्नात आहेत.

आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार पुन्हा सत्तेत येण्याच्या प्रयत्नात आहे, तर काँग्रेसकडून गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखाली आव्हान दिले जात आहे. पुद्दुचेरीमध्ये अखिल भारतीय एनआर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडी आणि द्रमुक यांच्यात मुख्य लढत अपेक्षित आहे. मुख्यमंत्री एन. रंगास्वामी पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहेत.

## परिवर्तनासाठी बंगालची जनता सज्ज : मोदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये अनागोंदी कारभारामुळे जनतेत असंतोष निर्माण झाला असून राज्यातील जनता परिवर्तनासाठी सज्ज असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. कोलकात्यातील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर झालेल्या सभेत त्यांनी हे वक्तव्य केले.

यावेळी पंतप्रधानांनी सुमारे १८,६८० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटनही केले. ब्रिगेड परेड ग्राऊंडचा इतिहास स्वातंत्र्यलढ्याशी जोडलेला असून आता "नव्या बंगाल"च्या निर्मितीचा बिगुलही याच ठिकाणाहून वाजत असल्याचे मोदी म्हणाले. सभेला संबोधित करताना त्यांनी तृणमूल काँग्रेस सरकारवर टीका केली. काँग्रेस, डावे आणि तृणमूल काँग्रेस या सरकारांच्या काळात बंगालचा विकास खुंटल्याचा आरोप त्यांनी केला. कट मनी, कमिशन आणि भ्रष्टाचारामुळे विकास योजनांचा लाभ सामान्य लोकांपर्यंत पोहोचत नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सभेला अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केल्याचा आरोपही मोदी यांनी केला. लोकांना सभेला येण्यापासून रोखण्यासाठी पूल बंद करण्यात आले, वाहतूक थांबवण्यात आली आणि भाजपचे झेंडे व पोस्टर काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या अडथळ्यांनंतरही मोठ्या संख्येने जमलेला जनसमुदाय ही परिवर्तनाची लाट असल्याचे त्यांनी म्हटले.

## सारांश वृत्त

### रस्ते अपघातात दोन मुलांचा मृत्यू

**जमशेदपूर** : झारखंडमधील जमशेदपूरमध्ये भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकच्या चाकाखाली येऊन दोन मुलांचा मृत्यू झाला, असे एका पोलिस अधिकाऱ्याने रविवारी सांगितले. सुंदरनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुडाडा परिसरात शनिवारी संध्याकाळी ही घटना घडली, असे त्यांनी सांगितले. पोलिस अधिकारी अजित मुंडा यांनी सांगितले की, १३-१४ वयोगटातील मृतांची ओळख दुर्गा हेम्ब्रम आणि मार्शल सोरेन अशी झाली आहे.

### केरळमध्ये राजकीय पक्षांमध्ये उत्साह

**तिरुवनंतपुरम** : निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर केरळमधील राजकीय पक्षांनी पुढील निवडणूक लढाईबद्दल विश्वास व्यक्त केला. केरळमध्ये १४० जागांसाठी ९ एप्रिल रोजी विधानसभेची निवडणूक होणार आहे. सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडी (एलडीएफ) च्या सीपीआय(एम) आणि सीपीआय या दोन्ही पक्षांनी त्यांचे उमेदवार जाहीर करणारे पहिले होते आणि त्यापैकी अनेकांनी घोषणा झाल्यानंतर लगेचच त्यांच्या निवडणूक मोहिमा सुरू केल्या.

### मुसळधार पावसानंतर मदतकार्य सुरू

**इम्फाळ** : मणिपूरच्या ईशान्येकडील राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसासह गारपीट झाल्यानंतर मुख्यमंत्री वाय खेमचंद सिंह यांनी अधिकाऱ्यांना उच्च सतर्क राहण्याचे आणि आवश्यक मदत उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. सिंह यांनी म्हटले आहे की, पाऊस आणि गारपिटीमुळे अनेक कुटुंबे आणि समुदायांना त्रास सहन करावा लागला. "सध्याची परिस्थिती पाहता, मी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना उच्च सतर्क राहण्याचे आणि बाधित लोकांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी त्वरित, समन्वित उपाययोजना करण्याचे कडक निर्देश दिले आहेत," असे ते म्हणाले.

## पुण्याच्या पाण्यावरून धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : खडकवासला धरणातून शहराला दिल्या जाणाऱ्या पाण्याची थकबाकी न भरल्यास २४ मार्चपासून पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे. या इशाऱ्याला महापालिकेने "धमकी" असे संबोधत आक्षेप घेतला असून हा विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

जलसंपदा विभागाने २०१६ पासून महापालिकेच्या पाणी वापरात १५ टक्के औद्योगिक आणि ५ टक्के व्यापारी वापर असल्याचे गृहीत धरून व्यावसायिक दराने बिल आकारले आहे. त्यावर दंडासह सुमारे ९४८ कोटी रुपयांची थकबाकी दाखवण्यात आली आहे. मात्र महापालिका शहरात केवळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करते, उद्योगांना पाणी देत नसल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

व्यावसायिक वापराचा दर प्रति घनमीटर ३० रुपये २५ पैसे आकारल्याने दरवर्षी सुमारे ५६ कोटी रुपयांचे अतिरिक्त बिल आकारले जात असल्याचा महापालिकेचा आरोप आहे. तसेच सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांबाबतही दरवर्षी सुमारे ५५ कोटी रुपयांचा दंड लावला जात असल्याने महापालिकेने त्यावर आक्षेप घेतला आहे. या संपूर्ण प्रकरणावर राज्य सरकारच्या पातळीवर निर्णय होण्याची शक्यता आहे.

## विधानसभा पोटनिवडणुका जाहीर; २३ एप्रिलला मतदान, ४ मे रोजी निकाल

# बारामतीत सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासह अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी मतदारसंघासाठी पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने या दोन्ही मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले असून २३ एप्रिल रोजी मतदान तर ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

राजकीय वर्तुळात बारामती पोटनिवडणूक बिनविरोध होण्याचीही चर्चा सुरू आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सहानुभूतीच्या पार्श्वभूमीवर इतर पक्षांकडून सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार दिला जाण्याची शक्यता कमी मानली जात आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली होती. तर राहुरी मतदारसंघाचे भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे तेथील जागाही रिक्त आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघांत पोटनिवडणूक होणार आहे. याच दिवशी पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी या राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले.

दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यानुसार सहा महिन्यांच्या आत त्यांना विधानसभा किंवा विधानपरिषद यापैकी एखाद्या सभागृहाचे सदस्य होणे आवश्यक आहे. त्यामुळे बारामती मतदारसंघातून सुनेत्रा पवार पोटनिवडणूक लढवतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीतही त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाल्याचे सांगितले जाते. सुनेत्रा पवार यांच्या रिक्त झालेल्या राज्यसभा जागेवर पार्थ पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राहुरी मतदारसंघाचे भाजप आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांचे गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये निधन झाले होते. त्यानंतर ही जागा रिक्त होती. आता या जागेसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीत भाजप कोणाला उमेदवारी देणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. काही स्थानिक पातळीवरील चर्चांनुसार राहुरीची निवडणूकही बिनविरोध करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.

अजितदादा पवार यांनी बारामती विधानसभा निवडणूक एकूण ८ वेळा लढवली. आणि सर्व वेळा त्यांनी विजय मिळवला. ते प्रामुख्याने बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडून येत होते. १९९१ ते २०२४ या कालावाधीत सलग आठ वेळा ते निवडून आले.

## भाजप खासदाराने घेतले विशेष दर्शन; प्रशासनावर दुजाभावाचा आरोप

# भीमाशंकर बंद असताना 'व्हीआयपी दर्शन'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : सर्वसामान्य भाविकांसाठी बंद असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिरात झारखंडमधील भाजप खासदार डॉ. निशिकांत दुबे यांनी विशेष दर्शन घेतल्याची घटना समोर आल्यानंतर नवा वाद निर्माण झाला आहे. मंदिर बंद असतानाही खासदारांसाठी नियम बाजूला ठेवण्यात आल्याचा आरोप होत असून प्रशासनावर दुजाभाव केल्याची टीका केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (१४ मार्च) दुपारी सुमारे २ वाजता डॉ. दुबे आपल्या कुटुंबीयांसह आणि नातेवाईकांसोबत हेलिकॉप्टरने भीमाशंकर येथे आले. त्यानंतर त्यांनी मंदिरात जाऊन विशेष दर्शन घेतल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, भीमाशंकर मंदिराच्या सभामंडप आणि पायरी मार्गाच्या बांधकामामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी ९ जानेवारी ते ९ एप्रिल २०२६ या कालावधीत मंदिर सर्वसामान्य भाविकांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे गेल्या अडीच महिन्यांपासून भाविकांना मंदिरात प्रवेश दिला जात नाही. महाशिवरात्रीच्या दिवशीही भाविकांना मंदिरात दर्शनाची परवानगी नव्हती. तसेच पत्रकारांनाही या परिसरात प्रवेश देण्यात आलेला नव्हता. मात्र, या पार्श्वभूमीवर हेलिकॉप्टरने आलेल्या खासदारांसाठी मंदिराचे दरवाजे उघडण्यात आल्याचा आरोप होत असून या घटनेमुळे स्थानिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या व्हीआयपी दर्शनप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणीही पुढे येत आहे.

याबाबत पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या प्रकरणाबद्दल अनभिज्ञता व्यक्त केली. प्रशासनाकडून दर्शनासाठी कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नसल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. निशिकांत दुबे हे झारखंडमधील गोड्डा मतदारसंघाचे खासदार असून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे निकटवर्ती मानले जातात. यापूर्वी मराठी भाषा आणि महाराष्ट्रातील नेत्यांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळेही ते चर्चेत आले होते.

### बंगालमध्ये डाव्यांचे पुनरुज्जीवन होईल

**रांची** : सीपीआयचे राष्ट्रीय सरचिटणीस डी. राजा यांनी रविवारी असे प्रतिपादन केले की, आगामी विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये डाव्यांना पुनरुज्जीवनाचा विश्वास आहे आणि ते एक अशी शक्ती म्हणून उदयास येईल जी राज्याच्या राजकीय चर्चासत्राला आकार देईल. निवडणूक आयोगाने चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशाच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्याच्या काही तास आधी राजा यांचे हे विधान आले. डावे पक्ष पुनरुज्जीवित होतील आणि राज्याच्या राजकीय चर्चेला आकार देतील, असे राजा यांनी रांची विमानतळावर पत्रकारांना सांगितले.

## फास्टॅगचा वार्षिक पासच्या दरात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : राष्ट्रीय महामार्गांवरील टोल भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फास्टॅगच्या वार्षिक पासच्या दरात वाढ करण्याचा निर्णय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने घेतला आहे. १ एप्रिल २०२६ पासून हा नवा दर लागू होणार असून खासगी वाहनचालकांना पाससाठी आधीपेक्षा जास्त रक्कम मोजावी लागणार आहे.

फास्टॅगच्या वार्षिक पासची किंमत यापूर्वी ३,००० रुपये होती. त्यात २.५ टक्क्यांची वाढ करण्यात आली असून आता हा पास ३,०७५ रुपयांना उपलब्ध होणार आहे. हा पास केवळ खासगी (नॉन-कमर्शियल) वाहनांसाठी लागू राहणार आहे.

१५ ऑगस्ट २०२५ पासून फास्टॅगचा वार्षिक पास घेण्याची सुविधा सुरू करण्यात आली होती. या पासमुळे टोल नाक्यांवर थांबण्याचा वेळ कमी होऊन प्रवास अधिक वेगवान आणि सोयीस्कर झाला आहे.

३,०७५ रुपयांचा वार्षिक पास घेतल्यानंतर तो एका वर्षासाठी किंवा २०० वेळा टोल नाका ओलांडण्यापर्यंत वैध राहणार आहे. या दोन्हीपैकी जे आधी पूर्ण होईल त्यानुसार पासची वैधता संपुष्टात येईल. जर एखाद्या वाहनचालकाने वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच २०० वेळा टोल नाका ओलांडला, तर त्याचा पास त्यानंतर वैध राहणार नाही. वाहनचालकांना वर्षभरात कधीही हा पास रिचार्ज करता येणार आहे. या योजनेला वाहनचालकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. सध्या देशभरात ५० लाखांहून अधिक वाहनचालक फास्टॅगच्या वार्षिक पासचा वापर करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. राष्ट्रीय महामार्गांवर खासगी वाहनांकडून घेतल्या जाणाऱ्या टोलपैकी सुमारे २८ टक्के व्यवहार वार्षिक पासद्वारे होत आहेत.

## भारतीय नौदलाचे परिस्थितीवर बारकाईने लक्ष

# 'ऑपरेशन संकल्प'मुळे भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मध्यपूर्वेत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष तीव्र होत असताना जगभरातील जहाजवाहतुकीवर त्याचा परिणाम होत आहे. विशेषतः जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी महत्त्वाची मानली जाणारी होर्मुझची सामुद्रधुनी असुरक्षित मानली जात असताना भारतीय नौदलाच्या 'ऑपरेशन संकल्प'मुळे भारतीय जहाजांना या मार्गावरून सुरक्षित प्रवास करता येत असल्याची माहिती समोर आली आहे.

संरक्षण क्षेत्रातील सूत्रांनुसार, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एससीआय)शी संबंधित दोन भारतीय ध्वजधारी एलपीजी टँकर 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' सध्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारताच्या दिशेने प्रवास करत आहेत. या जहाजांवर भारतीय नौदलाचे बारकाईने लक्ष ठेवले जात असून 'शिवालिक' या टँकरला तर भारतीय युद्धनौकेचे थेट संरक्षण देण्यात आले आहे.

याशिवाय ओमानहून आफ्रिकेकडे पेट्रोलियम उत्पादने घेऊन जाणारा 'जग प्रकाश' हा भारतीय तेलवाहू टँकरही होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील भागातून सुरक्षितपणे पुढे गेला आहे.

भारतीय जहाजांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारतीय नौदलाने जून २०१९ मध्ये 'ऑपरेशन संकल्प' सुरू केले. आखाती प्रदेशात वाढत्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. या अंतर्गत ओमानच्या किनाऱ्याजवळ भारतीय युद्धनौका तैनात ठेवून समुद्री मार्गांवर सतत लक्ष ठेवले जाते. नौदलाच्या माहितीनुसार, आतापर्यंत या मोहिमेत २३ युद्धनौका आलटून-पालटून तैनात करण्यात आल्या आहेत. या संवेदनशील समुद्री मार्गावर सुमारे २३ हजार भारतीय खलाशी आणि २४ व्यापारी जहाजांची हालचाल होत असते. भारतीय नौदल या जहाजांच्या सुरक्षिततेसाठी सतत गस्त घालत असून संभाव्य धोक्यांवर लक्ष ठेवत आहे. भारताच्या राजनैतिक प्रयत्नांनाही यश मिळाल्याचे मानले जात आहे. भारतातील इराणचे राजदूत मोहम्मद फताली यांनी भारताला लवकरच होर्मुझ सामुद्रधुनीतून अधिकृत सुरक्षित मार्ग मिळू शकतो, असे संकेत दिले आहेत.
परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि इराणी नेतृत्व यांच्यात झालेल्या चर्चेनंतर तणावपूर्ण वातावरणातही भारताचा ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो, असे सूत्रांचे म्हणणे आहे.
होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या समुद्री मार्गांपैकी एक मानली जाते. ही सामुद्रधुनी अवघी सुमारे ५५ किलोमीटर रुंद असली तरी जगातील जवळपास ३१ टक्के कच्च्या तेलाची वाहतूक याच मार्गाने होते. त्यामुळे या भागातील तणावाचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होण्याची भीती व्यक्त केली जाते.
अमेरिका आणि इस्रायल समर्थित जहाजांना या मार्गाने जाऊ देणार नाही, असा इशारा इराणकडून देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर तेलाच्या किमती प्रति बॅरल २०० डॉलर्सपर्यंत जाऊ शकतात, अशीही भीती व्यक्त केली जात आहे. भारतीय नौदल केवळ आखाती प्रदेशातच नव्हे तर जागतिक पातळीवरही आपली उपस्थिती मजबूत करत आहे.

## समाविष्ट गावांतील करसवलत मागणी फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील मालमत्ता कराबाबत सवलत देण्याची मागणी स्थायी समितीने फेटाळली आहे. प्रशासनाने दिलेला अभिप्राय मान्य केल्यामुळे या गावांतील नागरिकांना सध्याच्या दरानुसारच मालमत्ता कर भरावा लागणार आहे. राज्य शासनाने समाविष्ट गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या कराच्या दुप्पट दरानेच कर आकारणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार कर आकारणीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता. मात्र मुख्यसभेने घेतलेल्या निर्णयानुसारच या गावांमध्ये कर आकारणी करण्यात येत असल्याने करसवलत देणे शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. विशेष म्हणजे १५ सदस्यांच्या स्थायी समितीत ११ सदस्य हे समाविष्ट गावांमधील असतानाही प्रशासनाच्या भूमिकेला विरोध करण्यात आलेला नाही. नगरसेवक हरिदास चरवड आणि राजाभाऊ लायगुडे यांनी २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीचे पुनरावलोकन करण्याची मागणी करणारा प्रस्ताव दिला होता.

या प्रस्तावात ग्रामपंचायतीच्या दुप्पट दरापेक्षा जास्त कर आकारू नये तसेच संबंधित गावांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध झाल्यानंतरच टप्प्याटप्प्याने कर वाढ लागू करावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाने विद्यमान कर आकारणी कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## संपादकीय

# मौनाची मान्यता



**आंतरराष्ट्रीय कायद्याने युद्धाला मर्यादा घालण्याचा प्रयत्न केला असला, तरी इतिहास वारंवार वेगळेच चित्र दाखवतो. काही युद्धे उघडपणे बेकायदेशीर ठरतात, पण त्यांना विरोधापेक्षा मौनाची साथ मिळते. या मौनातच जागतिक व्यवस्थेच्या अधोगतीची कथा दडलेली आहे.**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने एक मोठा धडा घेतला होता. युद्धे रोखण्यासाठी आणि शक्तीच्या मनमानीला मर्यादा घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याची चौकट उभी करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली, आणि त्याच्या सनदेत स्पष्ट नमूद केले गेले की कोणत्याही सार्वभौम राष्ट्राविरुद्ध शक्तीचा वापर करणे तत्त्वतः बेकायदेशीर आहे. केवळ स्वसंरक्षण किंवा संयुक्त राष्ट्रांच्या परवानगीनेच लष्करी कारवाई करता येईल. परंतु या नियमांची अंमलबजावणी कितपत झाली, हा प्रश्न विचारला तर इतिहास निराशाजनक उत्तर देतो. अनेक युद्धे अशी झाली की ज्यांच्या कायदेशीरतेवर प्रश्नचिन्ह होते; तरीही ती झाली आणि जगाने त्यांना थांबवले नाही. कधी उघड पाठिंबा दिला गेला, तर कधी शांत मौन राखले गेले. या मौनातच जागतिक राजकारणातील एक मोठे दांभिकत्व दिसून येते. उदाहरणार्थ, २००३ साली इराकवर झालेल्या अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आक्रमणाकडे पाहिले तर हा विरोधाभास स्पष्ट दिसतो. त्या युद्धासाठी संयुक्त राष्ट्रांची स्पष्ट परवानगी नव्हती. नंतर संयुक्त राष्ट्रांचे तत्कालीन महासचिव कोफी अन्नान यांनीही ते युद्ध संयुक्त राष्ट्रांच्या सनदेला धरून नसल्याचे म्हटले होते. तरीही त्या आक्रमणाला जगातील काही शक्तिशाली देशांनी साथ दिली आणि अनेकांनी शांत राहणे पसंत केले. इतिहासाचा हा विरोधाभास नवीन नाही. नियम तयार करणे सोपे असते; परंतु त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती लागते. तीच अनेकदा अनुपस्थित असते. परिणामी कायद्याचा आधार घेऊन उभी केलेली व्यवस्था प्रत्यक्षात शक्तिशाली राष्ट्रांच्या निर्णयांवर अवलंबून राहते. आजच्या जागतिक परिस्थितीतही हेच चित्र दिसते. पश्चिम आशियातील संघर्ष असो, युक्रेनमधील युद्ध असो किंवा इतर प्रादेशिक तणाव अशा प्रत्येक ठिकाणी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन झाले का, हा प्रश्न उपस्थित होतो. उदाहरणार्थ, रशियाने २०२२ मध्ये युक्रेनवर केलेल्या आक्रमणाला आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन मानले गेले. तरीही त्या संघर्षाला थांबवण्याची संयुक्त राष्ट्रांची क्षमता मर्यादितच ठरली. या मर्यादेचे मूळ संयुक्त राष्ट्रांच्या रचनेत आहे. सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यांकडे व्हेटोचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांच्याशी संबंधित किंवा त्यांच्या हितसंबंधांशी जोडलेल्या प्रश्नांवर ठोस कारवाई करणे कठीण होते. परिणामी आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी अनेकदा राजकीय समीकरणांवर अवलंबून राहते. इतिहासात अनेक वेळा असे घडले आहे की एखाद्या संघर्षाला 'शांततेसाठी' किंवा 'स्थैर्यासाठी' असे आकर्षक नाव देण्यात आले. परंतु त्या नावामागे शक्तीच्या राजकारणाचा कठोर वास्तव लपलेले असते. एखाद्या देशाच्या सुरक्षेच्या नावाखाली दुसऱ्या देशावर आक्रमण केले जाते, आणि त्याला समर्थन देणारे किंवा विरोध न करणारे देश प्रत्यक्षात त्या कृतीला वैधता देतात. यालाच 'मौनाची मान्यता' असे म्हणता येईल. प्रत्यक्ष मतदानात किंवा ठरावांत विरोध नोंदवला जातो; पण त्यानंतर काहीच होत नाही. निषेधाचे शब्द असतात, परंतु कारवाई नसते. परिणामी बेकायदेशीर ठरलेले युद्धही प्रत्यक्षात चालू राहते. या प्रक्रियेत नैतिक प्रश्न अधिक गंभीर बनतो. कारण इतिहास केवळ कृती करणाऱ्यांची नोंद ठेवत नाही; तो मौन बाळगणाऱ्यांचीही नोंद ठेवतो. एखाद्या संघर्षात कोणाने आक्रमण केले, हे जितके महत्त्वाचे असते, तितकेच महत्त्वाचे असते की जगातील इतर शक्तींनी त्या आक्रमणाला कसा प्रतिसाद दिला. आजचे जागतिक राजकारण एका संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. शीतयुद्धानंतर निर्माण झालेली तथाकथित 'नियमाधारित व्यवस्था' अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. मोठ्या शक्तींमधील स्पर्धा वाढत आहे आणि त्याच वेळी आंतरराष्ट्रीय संस्थांची प्रभावीता कमी होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. काही विश्लेषकांच्या मते ही व्यवस्था कमकुवत होत आहे कारण तिच्या मूलभूत तत्त्वांचे पालन करणारे देशही त्यांना सोयीस्कर असताना त्याकडे दुर्लक्ष करतात. या पार्श्वभूमीवर एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. आंतरराष्ट्रीय कायदा हा खरोखरच सर्वांसाठी समान आहे का? की तो केवळ राजकीय भाषेत वापरला जाणारा एक साधन आहे? नियम केवळ दुर्बलांसाठी असतील आणि शक्तिशाली देश त्यांना सहज वाकवू शकत असतील, तर त्या व्यवस्थेची वैधता टिकवणे कठीण होते. युद्ध रोखण्याचा एकमेव मार्ग म्हणजे नियमांची काटेकोर अंमलबजावणी. पण त्यासाठी जागतिक नेतृत्वाने स्वतःवरही तेच नियम लागू केले पाहिजेत. अन्यथा 'कायद्याचे राज्य' ही सवंग घोषणा ठरेल आणि प्रत्यक्षात 'शक्तीचे राज्य' प्रस्थापित होते. इतिहासाचा धडा याच ठिकाणी महत्त्वाचा ठरतो. युद्धे केवळ रणांगणावर जिंकली किंवा हरली जात नाहीत; तर ती नैतिकतेच्या कसोटीवरही तपासली जातात. आणि त्या कसोटीत कधी कधी सर्वात मोठी चूक आक्रमणाची नसते, तर त्याबद्दल सोयिस्कर मौन बाळगणेही असते.

# वाढत्या डेटा केंद्रांची वाढती ऊर्जा गरज

भारताच्या अर्थव्यवस्थेतील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक म्हणजे डेटा केंद्रांचा उद्योग. इंटरनेटचा वाढता वापर, क्लाउड सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन व्यवहार आणि डेटा स्थानिकीकरणाच्या धोरणांमुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर डेटा केंद्रांची उभारणी होत आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा उद्योग मर्यादित होता; पण आता तो डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा बनत आहे. परंतु या वाढत्या डिजिटल जगाचे एक वास्तव अनेकदा दुर्लक्षित राहते आणि ती म्हणजे डेटा केंद्रे ही ऊर्जा आणि संसाधनांची अतिशय भुकेली यंत्रणा आहे.

सध्या भारतात शेकडो डेटा केंद्रे कार्यरत आहेत आणि त्यांची क्षमता झपाट्याने वाढत आहे. २०२० मध्ये सुमारे ५२० मेगावॅट इतकी असलेली क्षमता २०२५ पर्यंत जवळपास १.५ गिगावॅटपर्यंत पोहोचली आहे आणि दशकाच्या अखेरीस ती अनेकपटीने वाढण्याचा अंदाज आहे. या वाढीमागे कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड सेवा आणि डिजिटल सेवांचा वाढता वापर हे प्रमुख घटक आहेत. पण या वाढीचे एक महत्त्वाचे परिणाम म्हणजे ऊर्जा मागणीत होणारी झपाट्याची वाढ. डेटा केंद्रांना सतत, स्थिर आणि अखंडित वीजपुरवठा आवश्यक असतो. एका क्षणासाठीही वीजपुरवठा खंडित झाला तर डेटा, व्यवहार आणि नेटवर्कवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या केंद्रांसाठी मोठ्या प्रमाणात वीज राखीव ठेवावी लागते. सध्या भारतातील डेटा केंद्रांचा वीज वापर एकूण राष्ट्रीय वापराच्या तुलनेत कमी असला, तरी पुढील दशकात त्यात मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. २०२४ मध्ये सुमारे ०.८ टक्के असलेला वीज वापर २०३० पर्यंत सुमारे २.६ टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो. ही वाढ आकड्यांपुरतीच मर्यादित नाही; तर ती ऊर्जा व्यवस्थेवर प्रत्यक्ष ताण निर्माण करणारी आहे. भारतातील डेटा केंद्रांची क्षमता २०२५ मधील सुमारे १.५ गिगावॅटवरून २०३० पर्यंत ८ ते १० गिगावॅटपर्यंत जाऊ शकते आणि त्यासाठी लागणारी वीज ४० ते ४५ टेरावॅट-तास इतकी होण्याची शक्यता आहे. म्हणजेच डिजिटल पायाभूत सुविधांचा विस्तार हा वीज निर्मिती, वितरण आणि ग्रिड व्यवस्थापनासाठी एक नवीन आव्हान ठरणार आहे. ऊर्जेबरोबरच पाण्याचाही



**» डिजिटल अर्थव्यवस्थेच्या विस्तारासोबत भारतात डेटा केंद्रांचा प्रचंड वेगाने विस्तार होत आहे. पण या तंत्रज्ञानाच्या पायावर उभे असलेल्या उद्योगांना प्रचंड ऊर्जा आणि पाण्याची गरज आहे. त्यामुळे डिजिटल प्रगतीसोबत ऊर्जा शिस्त राखण्याची राष्ट्रीय गरज तीव्र झाली आहे.**

प्रश्न तितकाच गंभीर आहे. डेटा केंद्रातील सर्व्हर सतत कार्यरत असल्याने त्यांना थंड ठेवण्यासाठी प्रचंड प्रमाणात पाण्याची गरज असते. भारतातील डेटा केंद्रांनी २०२४ मध्ये अंदाजे १५० अब्ज लिटर पाणी वापरले, आणि हा वापर पुढील काही वर्षांत दुप्पट होऊ शकतो. पाणीटंचाईच्या समस्येला आधीच सामोरे जाणाऱ्या देशासाठी हा प्रश्न दुर्लक्ष करण्यासारखा नाही.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या उद्योगाची भौगोलिक एकाग्रता. भारतातील बहुतेक डेटा केंद्रे काही मोजक्या शहरांत विशेषतः मुंबई, चेन्नई, हैदराबाद आणि बेंगळुरू येथे केंद्रित आहेत. त्यात मुंबईचा वाटा सर्वाधिक आहे. त्यामुळे त्या शहरांवरील वीज आणि पाण्याचा ताण वाढतो. आधीच मोठ्या लोकसंख्येचा आणि उद्योगांचा भार असलेल्या या शहरांसाठी ही अतिरिक्त मागणी नियोजनाचा गंभीर प्रश्न बनू शकते. तरीही डेटा केंद्रांचा विरोध करणे हा उपाय नाही. कारण डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी ही केंद्रे अत्यावश्यक आहेत. क्लाउड संगणन, डिजिटल व्यवहार, कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-कॉमर्स आणि सरकारी डिजिटल सेवा या सर्वांचा पाया याच पायाभूत सुविधांवर उभा आहे. जगातील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. पुढील काही वर्षांत या क्षेत्रात शेकडो अब्ज डॉलर्सची गुंतवणूक अपेक्षित आहे. म्हणूनच प्रश्न डेटा केंद्रांचा नसून त्यांच्या ऊर्जा शिस्तीचा आहे. पहिला उपाय म्हणजे अक्षय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर. अनेक कंपन्या सौर किंवा पवन ऊर्जेच्या प्रकल्पांशी करार करून डेटा केंद्रांना हरित वीज पुरवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण अक्षय ऊर्जेची एक मर्यादा म्हणजे तिची अनियमितता. त्यामुळे ऊर्जा साठवणूक आणि स्मार्ट ग्रिड यांसारख्या तंत्रज्ञानावरही भर द्यावा लागेल.

दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा. आधुनिक डेटा केंद्रांमध्ये 'पॉवर युसेज इफेक्टिव्हनेस' या मापदंडावर भर दिला जातो. म्हणजेच संगणकीय कामासाठी वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेच्या तुलनेत इतर सहाय्यक प्रणालींवर किती ऊर्जा खर्च होते, हे कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. नवीन तंत्रज्ञानामुळे ही कार्यक्षमता वाढवणे शक्य आहे. तिसरा मुद्दा म्हणजे भौगोलिक संतुलन. डेटा केंद्रे केवळ मोठ्या महानगरांतच उभारण्याऐवजी विविध राज्यांत आणि कमी ताण असलेल्या प्रदेशांत उभारली गेली पाहिजेत. यामुळे वीज आणि पाण्यावरील स्थानिक ताण कमी होईल आणि देशातील डिजिटल पायाभूत सुविधांचे जाळे अधिक संतुलित बनेल.

भारत डिजिटल अर्थव्यवस्थेच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड संगणन आणि डेटा अर्थव्यवस्था यांमुळे प्रचंड संधी निर्माण होत आहेत. परंतु या संधींच्या मागे ऊर्जा आणि पर्यावरणाचे कठोर वास्तवही आहे. डिजिटल प्रगतीचा वेग जितका वाढेल, तितकी ऊर्जा व्यवस्थेची जबाबदारी वाढेल. म्हणूनच भारताने डिजिटल विकासाचा मार्ग स्वीकारताना ऊर्जा शिस्त ही मूलभूत अट मानली पाहिजे. अन्यथा डेटा केंद्रांच्या या डिजिटल क्रांतीमुळे उद्या ऊर्जा संकटाची नवी कथा लिहिली जाईल.

# सायबर सुरक्षेबाबत सजग राहणे काळाची गरज

## डॉ. रोहन न्यायाधीश यांचे मत; सायबर सुरक्षा विषयावरील कार्यशाळेचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** डिजिटल साधनांचा वाढता वापर लक्षात घेता सायबर सुरक्षेबाबत प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक असल्याचे मत सायबर तज्ज्ञ डॉ. रोहन न्यायाधीश यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च (आयबीएमआर), वाकड यांच्या वतीने आयोजित सायबर सुरक्षा विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेचे आयोजन वाकड येथील शैक्षणिक संकुलात करण्यात आले होते.




यावेळी समाजमाध्यमांचा वापर करताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक माहिती देणे टाळावे, तसेच कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन डॉ. न्यायाधीश यांनी केले. मोबाईलचा वापर करताना केवळ आवश्यक असलेल्या ॲप्सचाच वापर करावा आणि सायबर गुन्हा घडल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनीही मनोगत व्यक्त केले. देशात सायबर गुन्ह्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून अनेक प्रकरणांत लाखो-कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पिंपरी-चिंचवड सायबर पोलीस विभागातील तपास अधिकाऱ्यांनी सायबर गुन्ह्यांची कार्यपद्धती आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय याबाबत उदाहरणांसह मार्गदर्शन केले. डिजिटल टास्क फोर्सचे सायबर तज्ज्ञ अमित कांबळे यांनी क्यूआर कोडद्वारे मोबाईल हॅक कसा होऊ शकतो, याचे प्रात्यक्षिकही दाखवले. यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्सचे संचालक राजेश नागरे यांनी बँक खात्यांशी संबंधित सायबर फसवणूक टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयबीएमआरच्या संचालकांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरुषी पाटील आणि सानिका गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संपदा गुपचूप यांनी केले. या कार्यशाळेला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच इतर विद्यापीठांशी संलग्न व्यवस्थापन संस्थांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाण्याच्या टाक्यांच्या स्वच्छतेसाठी कोटींचा खर्च

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळा, रुग्णालये, दवाखाने आणि कार्यालयांमध्ये असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पद्धतीने साफसफाई व स्वच्छता करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी सुमारे २ कोटी २४ लाख ३३ हजार रुपयांचा खर्च होणार असून त्याला स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे.

महापालिका प्रशासनाने या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवली होती. त्यामध्ये तीन ठेकेदारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी एक ठेकेदार अपात्र ठरल्याने दोन ठेकेदार पात्र ठरले. त्यामध्ये 'राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था'ने सादर केलेला दर सर्वात कमी असल्याने या संस्थेला काम देण्यास स्थायी समितीने मान्यता दिली. शहरात महापालिकेच्या १०५ प्राथमिक आणि १८ माध्यमिक शाळा आहेत. तसेच विविध रुग्णालये, दवाखाने आणि क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आहेत. या टाक्यांची नियमित व शास्त्रोक्त पद्धतीने स्वच्छता करण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबवण्यात आली आहे. टाक्यांची स्वच्छता व्यवस्थित न झाल्यास किंवा दूषित पाणीपुरवठा झाल्यास संबंधित विभागावर कारवाई करण्यात यावी, अशी सूचना स्थायी समिती सदस्यांनी प्रशासनाला केली.

# पिंपरीतील ई-चार्जिंग स्टेशनचा प्रकल्प रखडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढत असताना ई-चार्जिंग स्टेशन उभारण्याचा महापालिकेचा प्रकल्प मात्र अद्याप कागदावरच असल्याचे चित्र आहे. महापालिकेने तीन वेळा निविदा प्रक्रिया राबवूनही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने शहरात एकही चार्जिंग स्टेशन उभारले गेलेले नाही. परिणामी, इलेक्ट्रिक वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून पर्यावरणपूरक वाहतुकीच्या उद्दिष्टालाही फटका बसत आहे.



महापालिकेने या प्रकल्पासाठी तीन वेळा निविदा काढल्या होत्या; मात्र ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर कितपत वाढेल याबाबतची अनिश्चितता आणि आर्थिक जोखीम यामुळे कंपन्यांनी या प्रकल्पात सहभाग घेण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले जाते. तिसऱ्या निविदेनंतर दिल्ली येथील एका कंपनीला टेंडर देण्यात आले होते.

नियोजित ठिकाणी चार्जिंग पॉइंट उभारण्याचे अधिकार त्या कंपनीला देण्यात आले; मात्र नंतर ही निविदा रद्द करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून निविदा रद्द होण्याचे प्रकार सुरू असल्याने हा प्रकल्प प्रत्यक्षात कधी सुरू होणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे ४० हजारांहून अधिक इलेक्ट्रिक वाहने नोंदणीकृत असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन विभागाने दिली आहे. वाहनांची संख्या वाढत असतानाही चार्जिंग स्टेशनची सुविधा उपलब्ध नसल्याने वाहनधारकांना खासगी चार्जिंग व्यवस्था किंवा लांबच्या ठिकाणी जावे लागत आहे. महापालिकेने शहरातील विविध ठिकाणी चार्जिंग पॉइंट उभारण्याचा प्रस्ताव तयार केला होता. त्यामध्ये ऑटो क्लस्टर, दुर्गा टेकडी, ट्रान्सपोर्टनगर परिसर, चिखली आरटीओ, बर्ड व्हॅली, आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल परिसर, भोसरी-लांडेवाडी, भक्ती-शक्ती चौक, बजाज ऑटो परिसर, एचए कॉलनी, संत तुकारामनगर, कासारवाडी, कोकणे चौक, राजर्षी शाहू उद्यान परिसर आणि सावित्रीबाई फुले उद्यान या ठिकाणांचा समावेश आहे.


प्रवासी वाहतूक करणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी विशेष चार्जिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा उद्देश आहे. शहरात चार्जिंग करून ही वाहने पुढील प्रवास सहज करू शकतील, अशी योजना आहे. मात्र चार्जिंग स्टेशन उभारणीला होत असलेल्या विलंबामुळे वाहनधारकांना सध्या चार्जिंगच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

## यू-डायस क्रमांक गोठवण्याची शिफारस

# फी वाढ व सक्तीच्या खरेदीप्रकरणी शाळा अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** रावेत येथील 'अराइज इंटरनॅशनल स्कूल' या खाजगी शाळेविरुद्ध फी वाढ तसेच पुस्तके व गणवेश खरेदीची सक्ती केल्याच्या तक्रारींमुळे कारवाईची प्रक्रिया सुरू झाली आहे. शिक्षण विभागाच्या निर्देशांचे पालन न केल्याचा ठपका ठेवत शाळेचा यू-डायस क्रमांक गोठवण्याची शिफारस करण्यात आली असून त्यामुळे शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याची चर्चा आहे.




बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अंतर्गत या शाळेविरुद्ध पालकांकडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने शाळेला वारंवार नोटिसा बजावल्या होत्या. ३ जुलै २०२५ रोजी झालेल्या सुनावणीत शाळा व्यवस्थापनाला स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.

सुनावणीदरम्यान विद्यार्थ्यांना गणवेश, शूज व पुस्तके विशिष्ट ठिकाणाहून खरेदी करण्यास सक्ती करू नये, दरवर्षी पुस्तकांचे प्रकाशन बदलू नये, 'डिजिटल प्लॅटफॉर्म'च्या नावाखाली आकारलेली फी पालकांना परत करावी तसेच फी वाढीबाबतचा संपूर्ण तपशील शिक्षण विभागाकडे सादर करावा, असे आदेश देण्यात आले होते.

मात्र, शिक्षण विभागाच्या या निर्देशांचे पालन शाळेकडून करण्यात आलेले नसल्याचे समोर आले आहे. उलट शिक्षक-पालक संघाची मान्यता न घेता २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या सलग तीन शैक्षणिक वर्षांत फी वाढ केल्याचे शाळेने सादर केलेल्या तक्त्यातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा ठपका शाळेवर ठेवण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात कारवाई करण्यास शिक्षण विभागातील प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी जाणूनबुजून दिरंगाई केल्याचा आरोपही करण्यात येत आहे. वारंवार तक्रारी आणि सुनावण्या होऊनही ठोस कारवाई न झाल्याने विद्यार्थ्यांच्या हितावर परिणाम होत असल्याची टीका पालकांकडून केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित शाळेचा यू-डायस क्रमांक गोठवण्याची मागणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण अधिकारी संगीता बांगर यांनी पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण अधिकाऱ्यांकडे केली आहे. या निर्णयावर अंतिम कारवाई झाल्यास शाळेच्या मान्यतेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उन्हाच्या झळा वाढताच माठांना मागणी वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच उन्हाचा कडाका वाढू लागल्याने थंड पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मातीच्या माठांना पिंपरी-चिंचवड शहरात मोठी मागणी वाढली आहे. शहरातील विविध भागांत हातगाड्यांवरून माठांची विक्री सुरू असून नागरिकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

पिंपरी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, वल्लभनगर, मोरवाडी, लालटोपीनगर, मासुळकर कॉलनी, अजमेरा वास्तूउद्योग तसेच यशवंतनगर परिसरात माठ विक्रेते हातगाड्यांवरून वसाहतींच्या रस्त्यांवर फिरत विक्री करताना दिसत आहेत. उन्हाळ्यात थंड पाण्यासाठी मातीच्या माठाचा वापर करण्याची परंपरा आजही कायम असल्याने नागरिकांकडून त्यांची मागणी वाढत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

फ्रिजचा वापर वाढला असला तरी माठातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड आणि आरोग्यास उपयुक्त असते, असा समज अनेकांमध्ये असल्याने घरगुती वापरासाठी माठ खरेदी केले जात आहेत. त्यामुळे शहरातील मातीची भांडी विकणाऱ्या व्यावसायिकांकडे विविध आकारांचे माठ उपलब्ध करून ठेवण्यात आले आहेत.

दरम्यान, यंदा मातीच्या भांड्यांच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जण ठार

**उरुळी कांचन** : पुणे-सोलापूर महामार्गावर अपघातांची मालिका सुरू असतानाच कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत एका अनोळखी इसमाचा जागीच मृत्यू झाला. इनामदार वस्ती परिसरातील अमर रोज नर्सरीसमोर रविवारी (दि. १५) सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी सचिन रामराव कडवळे (वय ४७, रा. कड वस्ती, कोरेगाव मूळ, ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावर एक अनोळखी व्यक्ती पायी जात होती. त्याच वेळी भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्या व्यक्तीस जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, त्या व्यक्तीस गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर अज्ञात वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला. मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू असून पुढील तपास उरुळी कांचन पोलीस करत आहेत.




### चुलत्याकडून पुतणीवर अत्याचार

**लोणी काळभोर** : लोणी काळभोर परिसरात नातेसंबंधांना काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सख्ख्या चुलत्यानेच पुतणीवर वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला असून या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी २२ वर्षीय पीडितेच्या आईने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या फिर्यादीच्या आधारे पोलिसांनी आरोपी चुलत्याविरुद्ध बलात्कारासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा नोंद होताच लोणी काळभोर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली. त्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत.

---

व्यावसायिक एलपीजी गॅसच्या तुटवड्याचा फटका

# चाकण एमआयडीसीतील उद्योग अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण** : व्यावसायिक एलपीजी गॅसच्या तुटवड्याचा फटका आता चाकण एमआयडीसी परिसरातील उद्योग आणि कॅन्टीन व्यवसायाला बसू लागला आहे. गॅस सिलिंडरवर चालणाऱ्या उद्योगांमध्ये अडथळे निर्माण झाले असून अनेक कॅन्टीन व्यावसायिकांना सेवा बंद ठेवण्याची वेळ आली आहे. परिणामी, औद्योगिक परिसरातील कामगारांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

चाकण औद्योगिक परिसरातील काही उद्योगांमध्ये एमएनजीएलच्या पाइपलाइनद्वारे गॅसपुरवठा सुरू असल्याने मर्यादित प्रमाणात उत्पादन सुरू ठेवणे शक्य होत आहे. मात्र ज्या उद्योगांमध्ये गॅस सिलिंडरच्या टाक्यांचा वापर केला जातो, अशा सुमारे ३० टक्के उद्योगांवर या तुटवड्याचा थेट परिणाम झाला आहे.

आखाती भागातील तणाव आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम गॅसपुरवठ्यावर होत असल्याचे उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींचे म्हणणे आहे. व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा खंडित झाल्याने हॉटेल व कॅन्टीन व्यवसायिकांमध्ये चिंता वाढली आहे.

सध्या काही कॅन्टीन व हॉटेल्स शिल्लक साठ्यावर सेवा सुरू ठेवत असली तरी ही परिस्थिती कायम राहिल्यास पुढील दोन दिवसांत सुमारे ८० टक्के कॅन्टीन बंद पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

चाकण एमआयडीसी परिसरात लाखो कामगार विविध कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. या कामगारांसाठी चहा, नाश्ता आणि जेवणाचा पुरवठा करणाऱ्या शेकडो कॅन्टीन आणि लघुव्यवसायिकांवर सध्याच्या परिस्थितीचा मोठा परिणाम झाला आहे. गॅस उपलब्ध नसल्यामुळे अनेक कॅन्टीन चालकांना कंपन्यांना दोन वेळचा चहा पुरवणेही कठीण झाले असून काही ठिकाणी कॅन्टीन बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

कॅन्टीन आणि हॉटेल व्यावसायिकांनी सांगितले की, त्यांच्या व्यवसायातून अनेक कंपन्यांमध्ये चहा, नाश्ता आणि जेवणाचा पुरवठा केला जातो. मात्र सध्या गॅस तुटवड्यामुळे व्यवसायावर गंभीर परिणाम होत आहे. वाहतूक खर्चात वाढ आणि गॅसची कमतरता यामुळे उद्योगांशी संबंधित लघुव्यवसाय अडचणीत आले आहेत. शासनाने तातडीने गॅसपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा हा सरकारचा सध्या प्रमुख प्राधान्यक्रम असल्याने हॉटेल आणि इतर व्यावसायिकांसाठी तातडीने निर्णय होण्याची शक्यता कमी असल्याचे सांगितले जात आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सध्या रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांना व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने केला जात असल्याची माहितीही समोर येत आहे.

चाकण शहर आणि परिसरातही गॅस एजन्सीसमोर मोठी गर्दी दिसून येत आहे. इराण-इस्त्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भविष्यात गॅस मिळेल की नाही, या भीतीने अनेक ग्राहकांनी एकाच वेळी सिलिंडर बुकिंग करण्यास सुरुवात केली. अचानक वाढलेल्या मागणीमुळे ऑनलाइन बुकिंग प्रणालीवर ताण आला असून काही ठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याचेही सांगितले जात आहे. परिणामी अनेक नागरिक थेट एजन्सीकडे जाऊन सिलिंडर मिळवण्याचा प्रयत्न करत असून काही ठिकाणी २ ते ३ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे.

## दौंड तालुक्यातही होतेय गॅस सिलिंडरसाठी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : सध्या सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाल्याने गॅस सिलेंडरसाठी सर्वत्र मोठी गर्दी होत आहे. दौंड तालुक्यातही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने तहसील कार्यालयामार्फत नागरिकांना आवाहन करणारी जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाकडून खबरदारीचा उपाय म्हणून इंधन पुरवठ्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून जिल्ह्यात कार्यरत असलेल्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड या तिन्ही कंपन्यांकडे दौंड तालुक्यासाठी पेट्रोल, डिझेल तसेच एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे संबंधित कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे इंधनाचा पुरवठा नियमित आणि सुरळीतपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

मार्चच्या सुरुवातीला घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ झाली आहे. घरगुती सिलेंडरचा दर आता ९२६.५० रुपये झाला आहे. तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमतही वाढून सुमारे १९२५ रुपये झाली आहे. याशिवाय घरगुती सिलेंडर मिळण्याच्या कालावधीतही बदल करण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि तेल कंपन्या जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा कायम राहील यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच गॅस सिलेंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांनी दिला आहे.

---

## शहीद दिनानिमित्त राजगुरुनगरमध्ये विविध उपक्रम; अभिवादन कार्यक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : शहीद दिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत ठेवण्यासाठी राजगुरुनगर नगरपरिषदेच्या वतीने प्रथमच शहरात तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ ते २३ मार्च दरम्यान मॅरेथॉन स्पर्धा, सायकल स्पर्धा, व्याख्यान आणि आरोग्य शिबिरासह अनेक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ आणि उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२३ मार्च शहीद दिनानिमित्त शहरात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती देण्यासाठी नगर परिषद कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ म्हणाले की, देशासाठी बलिदान देणारे क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी २३ मार्च रोजी शहीद दिन साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर नगरपरिषदेने यंदा तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

दि. २१ मार्च रोजी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर शाहीर अभि मुंडे यांचे व्याख्यान होणार आहे. दि. २२ मार्च रोजी सर्व वयोगटांसाठी सायकल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर दि. २३ मार्च रोजी नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. शहीद दिनाच्या दिवशी हुतात्मा राजगुरू जन्मस्थळ स्मारक येथे ध्वजारोहण व अभिवादन कार्यक्रमही आयोजित करण्यात येणार असून या कार्यक्रमास जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, हुतात्मा राजगुरू स्मारकाचे काम सध्या सुरू असून ते येत्या वर्षभरात पूर्ण होण्याची अपेक्षा असल्याचेही नगर परिषदेकडून सांगण्यात आले.

## २१ हजारांहून अधिक प्रकरणांचा निपटारा

जुन्नर येथील लोकन्यायालयात ५ कोटी ५० लाख रुपयांची वसुली

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्नर** : अतिरिक्त सत्र न्यायालय, जुन्नर येथे आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयात एकूण २१,२७१ प्रकरणांचा आपसी समझोत्याने निपटारा करण्यात आला. तसेच प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणांमधून ५ कोटी ५० लाख ४२ हजार २५२ रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

दि. १४ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या सौजन्याने व तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या वतीने राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. या लोकन्यायालयाचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना न्यायाधीश शेलार यांनी "न्याय आपल्या दारी" या संकल्पनेनुसार विधी सेवा प्राधिकरण नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचे सांगितले. लोकन्यायालयाच्या माध्यमातून पक्षकारांनी प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढून वेळ व खर्चाची बचत करावी, असे आवाहन त्यांनी केले. या लोकन्यायालयात दिवाणी व फौजदारी प्रकरणे, दावा दाखलपूर्व बँक वसुली प्रकरणे, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था आणि फायनान्स संस्थांची प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. दिवसभर चाललेल्या कामकाजात चार पॅनलद्वारे दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये एकूण २१,२७१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.

कार्यक्रमास दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. एम. हुसेन, सह-दिवाणी न्यायाधीश ए. एच. बाजड, दिवाणी न्यायाधीश एस. एस. जैन तसेच जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत हडवळे, उपाध्यक्ष संतोष लोहके, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, लोकअदालत पॅनल सदस्य ॲड. सोमनाथ कोकणे, ॲड. आर. जी. इनामदार, ॲड. नुतन शेगर, ॲड. रत्ना हांडे उपस्थित होते.

राष्ट्रीय लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी जुन्नर वकील बार असोसिएशनचे पदाधिकारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, पंचायत समिती जुन्नर, बँका, ग्रामपंचायती, महावितरण, पतसंस्था, फायनान्स संस्था तसेच समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे येथील स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

---

## वाढदिवसाच्या दिवशीही आ. बाबाजी काळे शिबिरात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : स्वतःच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वीकारण्याऐवजी नागरिकांच्या कामाला प्राधान्य देत आमदार बाबाजी काळे यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान' शिबिराला उपस्थिती लावली. राजगुरुनगर येथील रिद्धी-सिद्धी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात त्यांनी नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारींचा आढावा घेतला.

दरवर्षी १४ मार्च रोजी आमदार काळे आपल्या 'जय हरी' निवासस्थानी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा स्वीकारण्यासाठी उपस्थित असतात. यंदा मात्र त्याच दिवशी शासनाच्या महसूल अभियानाचे शिबिर आयोजित करण्यात आल्याने त्यांनी वाढदिवसाच्या कार्यक्रमापेक्षा जनतेच्या कामाला प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने शिवसैनिक, हितचिंतक व पदाधिकारी जमले असतानाही ते शिबिरात सहभागी झाले.

या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरा'च्या माध्यमातून नागरिकांच्या जमीन, सातबारा, फेरफार, वारस नोंद आदी महसूल विषयक अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शासनाच्या विविध सेवा आणि योजना नागरिकांपर्यंत सुलभ व जलद पद्धतीने पोहोचाव्यात यासाठी अशा शिबिरांचे मोठे महत्त्व असल्याचे आमदार बाबाजी काळे यांनी यावेळी सांगितले. शिबिरात अनेक लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटपही करण्यात आले.

या कार्यक्रमास तहसीलदार प्रशांत बेडसे, सभापती विजयसिंह शिंदे-पाटील, तालुकाप्रमुख रामदास धनवटे, सभापती विद्याताई मोहिते, जिल्हा परिषद सदस्या तनुजाताई घनवट, गणेश आरगडे, उपतालुकाप्रमुख संजय घनवट, उपसभापती मंगेश सावंत, पंचायत समिती सदस्या गौरी मुऱ्हे, बाजार समितीचे संचालक सागर मुऱ्हे, केशव आरगडे, निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, महसूल नायब तहसीलदार राम बिजे, कडूस मंडळ अधिकारी विद्या नांगरे तसेच कडूस मंडळातील तलाठी उपस्थित होते.

## वडगावपीर येथे बैलगाडा शर्यतींना उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील वडगावपीर येथे श्री पिरसाहेब यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शर्यती मोठ्या उत्साहात पार पडल्या. तापलेल्या उन्हातही हजारो बैलगाडा शौकिनांनी उपस्थित राहून शर्यतींचा आनंद घेतला. या स्पर्धेत एकूण १७४ बैलगाडा मालकांनी सहभाग नोंदवला.

शर्यतीच्या पहिल्या फेरीत १४४ गाड्यांनी धाव घेतली, तर अंतिम फेरीसाठी १२ गाड्यांची निवड झाली. सलग तिसऱ्या वर्षी मानकरी म्हणून १८ गाड्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत 'घाटाचा राजा' मानकरी म्हणून सविंदणे येथील माजी सरपंच वसंत गहिणजी पडवळ यांचा सन्मान करण्यात आला. २० फुटावरील कांडे मानकरी कै. भागाजी मनाजी करंजखिले व कै. लक्ष्मणनाना बाळाजी खळदकर-जुगलबंदी (जातेगाव) यांच्या नावाने देण्यात आले.

स्पर्धेच्या विविध गटांतील विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांकाच्या फेरीत २९ गाड्यांनी सहभाग घेतला असून त्यामध्ये अवसरी बुद्रूक येथील रितेश चंद्रकांत शिंदे यांनी पहिले स्थान पटकावले. द्वितीय क्रमांकाच्या फेरीत ६५ गाड्यांपैकी खेड येथील राजेंद्र गणपत होले यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांकाच्या फेरीत २५ गाड्यांपैकी लोणी येथील कै. विष्णू रामकृष्ण वाळुंज यांच्या गाडीने पहिला क्रमांक मिळवला. चतुर्थ क्रमांकाच्या फेरीत १० गाड्यांपैकी वडगावपीर येथील ओंकार अंकुश पोखरकर यांनी अव्वल स्थान पटकावले.

अंतिम फेरीत १२ गाड्यांनी धाव घेतली. यामध्ये मल्हारी शिवराम जगताप व बाळासाहेब हरीभाऊ जाधव, बारकुशेठ सखाराम जगताप व मारुती विष्णू डोके (संत सावता माळी बैलगाडा संघटना) तसेच बाबूशेठ संजय पोखरकर व विकास ज्ञानेश्वर पंचरास यांच्या गाड्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक विनायक सुदाम ढोबळे व भगवान बाबुराव गावडे तसेच पोपटराव गोविंद आदक व कृष्णा विजय मेरगळ यांच्या गाड्यांना मिळाला. तृतीय क्रमांक कचरशेठ रामभाऊ पानमंद (चांदोह) आणि तुकाराम सावकार जाधव व शरद मारुती आदक (वडगावपीर) यांच्या गाड्यांना मिळाला.

सलग तिसऱ्या वर्षी मानकरी ठरलेल्या १४ गाड्यांनीही शर्यतीत सहभाग घेतल्याची माहिती माजी सरपंच संजय पोखरकर व गोरक्ष आदक यांनी दिली. या बैलगाडा शर्यतीचे नियोजन वडगावपीर-मांदळेवाडी ग्रामस्थांनी केले होते. यात्रा काळात पारगाव-कारखाना पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

---

भाजीपाला आणि पालेभाज्यांचीही मोठ्या प्रमाणावर आवक

# चाकण बाजारपेठेत कांद्याची आवक वाढली तरी भाव स्थिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण** : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत आवक वाढली असली तरी कांद्याचे दर मात्र स्थिर राहिले. बाजारात भाजीपाला आणि पालेभाज्यांचीही मोठ्या प्रमाणावर आवक झाली असून एकूण उलाढाल सुमारे ६ कोटी ९० लाख रुपयांची झाली.

चाकण बाजारात कांद्याची एकूण १२ हजार क्विंटल आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत आवक सुमारे ३ हजार क्विंटलने वाढली; मात्र कमाल दर १,४०० रुपयांवर स्थिर राहिला. बटाट्याची आवक १,४०० क्विंटल झाली असून त्यालाही कमाल १,२०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. लसणाची आवक ५० क्विंटल झाली आणि कमाल दर १२ हजार रुपयांपर्यंत स्थिर राहिला. हिरव्या मिरचीची आवक ३२५ क्विंटल झाली असून तिला ५ हजार ते ७ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

दरम्यान, फळभाज्यांच्या बाजारातही मोठ्या प्रमाणावर आवक झाली. टोमॅटोची ३०८ क्विंटल आवक होऊन त्याला १,००० ते १,५०० रुपये दर मिळाला. कोबी २२५ क्विंटल (४०० ते ६०० रुपये), फ्लॉवर १८७ क्विंटल (१,००० ते १,५०० रुपये), वांगी ७२ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये) आणि भेंडी ८० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये) अशी आवक झाली.

दोडका ५८ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रुपये), कारली ६४ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रुपये), दुधीभोपळा ६२ क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), काकडी ११५ क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), फरशी ५० क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), वालवड ५० क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये) आणि ढोबळी मिरची १०४ क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये) अशीही मोठी आवक झाली. याशिवाय चवळी ३८ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), वाटाणा १६० क्विंटल (२,५०० ते ३,००० रुपये), शेवगा ५२ क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये), गाजर ७५ क्विंटल (१,५०० ते २,००० रुपये), गवार ४१ क्विंटल (६,००० ते ८,००० रुपये) आणि आले १५० क्विंटल (३,५०० ते ४,५०० रुपये) अशी आवक झाली.

मेथीच्या १६ हजार १९० जुड्या बाजारात आल्या असून त्याला ६०० ते १,००० रुपये दर मिळाला. कोथिंबिरीच्या २४ हजार ५०० जुड्या (५०० ते ८०० रुपये), शेपूच्या २ हजार ५६० जुड्या (५०० ते ८०० रुपये) आणि पालकाच्या २ हजार ४९० जुड्या (६०० ते ८०० रुपये) अशी आवक झाली.

जनावरांच्या बाजारातही व्यवहार झाले. विक्रीसाठी आलेल्या ५५ जर्सी गाईंपैकी ३७ गाईंची विक्री झाली असून त्यांना १५ हजार ते ७० हजार रुपये दर मिळाला. ९० बैलांपैकी ६५ बैलांची विक्री १० हजार ते ४० हजार रुपयांदरम्यान झाली. १३५ म्हशींपैकी ११० म्हशींची विक्री ३० हजार ते ८० हजार रुपयांपर्यंत झाली. तसेच बाजारात आलेल्या ११,५०० शेळ्या-मेंढ्यांपैकी ११,०५० प्राण्यांची विक्री झाली असून त्यांना २,००० ते १५,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

## खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भानुदास पऱ्हाड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरूनगर** : खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भानुदास पऱ्हाड यांची एकमताने निवड करण्यात आली. चाकण येथे मावळते अध्यक्ष कोंडीभाऊ पाचारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

संघाच्या उपाध्यक्षपदी रुपेश बुट्टे पाटील, सिद्धेश कर्नावट आणि तुषार मोढवे यांची निवड करण्यात आली. सचिवपदी तुकाराम बोंबले, तर कार्याध्यक्षपदी राजेंद्र मांजरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी सहसचिव शरद भोसले, सहकार्याध्यक्ष आदेश टोपे व विजय मुऱ्हे, कोषाध्यक्ष रत्नेश शेवकरी, सहकोषाध्यक्ष अशोक टिळेकर आणि कुंडलिक वाळुंज, गणेश आहेरकर तसेच सोशल मीडिया प्रमुख प्रफुल्ल टंकसाळे यांचीही निवड करण्यात आली. याशिवाय सल्लागार म्हणून कोंडीभाऊ पाचारणे, एकनाथ सांडभोर, अविनाश दुधवडे, राजेंद्र सांडभोर, नंदकुमार मांदळे, ए. पी. शेख, गणेश फलके आणि चंद्रकांत मांडेकर यांचा समावेश करण्यात आला आहे. कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. निलेश कड पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

## सारांश वृत्त

### शिमलामध्ये पाऊस; गारपिटीचा तडाखा

**शिमला:** शिमला आणि त्याच्या आसपासच्या भागात रविवारी वादळी वाऱ्यासह पाऊस पडला, तर कुल्लू, लाहौल आणि स्पीती जिल्ह्यातील उंचावरील भागात पुन्हा एकदा नवीन बर्फवृष्टी झाली. आकाशात काळे, संवहनशील ढग होते, ज्यामुळे काही भागात दृश्यमानता लक्षणीयरीत्या कमी झाली. अटल बोगद्यासह मनालीच्या वरच्या टेकड्यांवर हलकी बर्फवृष्टी झाली. बर्फाचा आनंद घेत असलेल्या पर्यटकांचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहेत.

### द्रमुकच्या आघाडीची जोरदार निदर्शने

**चेन्नई** : देशभरात घरगुती आणि व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या कमतरतेबद्दल केंद्र सरकारवर टीका करत द्रमुकच्या नेतृत्वाखालील धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडीने रविवारी राज्यव्यापी निदर्शने केली. या निदर्शनांमध्ये काँग्रेस, डावे पक्ष आणि थोल थिरुमावलवन यांच्या नेतृत्वाखालील व्हीसीके यासारख्या आघाडीतील घटक पक्षांचा सहभाग होता. या पक्षांनी असा आरोप केला आहे की अनेक घरे आणि एमएसएमई क्षेत्रावर परिणाम करणारे हे संकट केंद्र सरकारच्या "चुकीच्या धोरणांमुळे" आणि नियोजनाच्या अभावामुळे उद्भवले आहे.

### इम्फाळ येथे महिला दहशतवाद्याला अटक

**इम्फाळ** : बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) या संघटनेसाठी भरती केल्याच्या आरोपाखाली मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात एका महिला दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील सावोम्बुंग फॉरेस्ट गेट परिसरातून खांगेम्बम औना देवी उर्फ इबेयिमा हिला अटक करण्यात आली. हेंगलेप पोलिस ठाण्याच्या हद्दीत थांगजिंग टॉपच्या पूर्वेकडील ओल्ड नाबिल भागातून सुरक्षा दलांनी एका वेगळ्या कारवाईत सात फूट लांबीचे देशी बनावटीचे रॉकेट, ६० किलो स्फोटके, एक देशी बनावटीची सिंगल-बॅरल रायफल, चार मॅगझिन आणि दोन मोर्टार जप्त केले.

## दुबईसह अनेक ठिकाणी हल्ले, इंधन व व्यापारावर परिणाम

# पश्चिम आशियातील तणावात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दुबई/नवी दिल्ली** : इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने धोकादायक वळण घेतले असून या युद्धाला आता १६ दिवस झाले आहेत. संघर्षाची व्याप्ती वाढत चालल्याने पश्चिम आशियातील अनेक देशांवर त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. संयुक्त अरब अमिरातीतील दुबईसह काही भागांमध्ये हल्ल्यांच्या घटना घडल्याची माहिती समोर आली असून त्यामुळे जागतिक इंधनपुरवठा आणि व्यापारावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



रविवारी दुबईतील मरीना आणि अल सुफूह या भागांमध्ये मोठे स्फोट झाल्याचे आणि आकाशात काळा धूर पसरल्याचे स्थानिक वृत्तांत म्हटले आहे. या भागांमध्ये क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ले झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. संयुक्त अरब अमिरातीमध्ये हवाई संरक्षण प्रणाली तैनात असली तरी परिस्थिती तणावपूर्ण असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावरही ड्रोनद्वारे हल्ला करण्यात आल्याचे वृत्त आहे. मात्र या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. फुजैराह परिसरातही धुराचे लोट दिसल्याचे सांगितले जात असून त्या ठिकाणी जॉर्डनमधील एका नागरिकाला किरकोळ दुखापत झाल्याचे वृत्त आहे. अमेरिकेने इराणच्या तेलपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या खार्ग बेटावर हल्ला केल्यानंतर तणाव आणखी तीव्र झाला आहे. इराणच्या तेल निर्यातीपैकी सुमारे ९० टक्के पुरवठा या बेटावरून होत असल्याचे मानले जाते. या पार्श्वभूमीवर इराणकडून संयुक्त अरब अमिरातीसह इतर काही भागांवर मोठ्या प्रमाणात ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. उपलब्ध माहितीनुसार, युएईमध्ये सुमारे १,६०० ड्रोन, २९४ क्षेपणास्त्रे आणि १५ क्रूझ क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले असल्याचे सांगितले जाते. या हल्ल्यांमध्ये किमान २९४ जणांचा मृत्यू झाला असून १४० हून अधिक जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. शनिवारीच ३३ ड्रोन हल्ले करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

पश्चिम आशियात वाढलेल्या या तणावाचा परिणाम भारताच्या निर्यात क्षेत्रावरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीभोवती वाढलेल्या भू-राजकीय तणावामुळे जहाजवाहतुकीवर अनिश्चितता निर्माण झाली आहे. वाहतूक कालावधी वाढणे आणि विमा शुल्कात वाढ होणे यामुळे निर्यातदार चिंतेत असल्याचे उद्योग क्षेत्रातील सूत्रांनी सांगितले.

वस्त्रोद्योगातील तज्ज्ञांच्या मते, या संकटामुळे पुढील काही महिन्यांत पश्चिम आशियातील निर्यात ऑर्डरमध्ये घट होण्याची शक्यता आहे. भारताच्या एकूण कपड्यांच्या निर्यातीपैकी सुमारे ११.८ टक्के निर्यात पश्चिम आशियातील देशांकडे जाते. संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, इस्रायल, कुवेत, ओमान, कतार, इराक, बहरीन आणि इराण या देशांकडे भारताची तयार कपड्यांची निर्यात २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुमारे १.९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. मागील आर्थिक वर्षात ही निर्यात १.८२ अब्ज डॉलर्स इतकी होती. एकूणच, भारताची वस्त्र निर्यात २०२३-२४ मध्ये १४.५१ अब्ज डॉलर्स होती, तर २०२४-२५ मध्ये ती सुमारे १५.९७ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढल्याचे सांगितले जाते.

## उरी सेक्टरमध्ये घुसखोरीचा प्रयत्न लष्कराने उधळला



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) घुसखोरीचा प्रयत्न भारतीय लष्कराने हाणून पाडला. या कारवाईत एका दहशतवाद्याला ठार करण्यात आले, अशी माहिती लष्कराने दिली.

श्रीनगरस्थित लष्कराच्या १५व्या कॉर्प्सने 'एक्स'वरील पोस्टद्वारे ही माहिती दिली. जम्मू-काश्मीर पोलिसांकडून मिळालेल्या विशिष्ट गुप्तचर माहितीच्या आधारे १४ आणि १५ मार्चच्या मध्यरात्री उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील उरी सेक्टरच्या बुछार परिसरात लष्कर आणि पोलिसांनी संयुक्त मोहीम सुरू केली. या कारवाईदरम्यान सैनिकांना झाडीत एका दहशतवाद्याची संशयास्पद हालचाल दिसून आली. त्यानंतर सुरक्षा दलांनी आपली मांडणी बदलत संबंधित व्यक्तीला शरण येण्याचे आवाहन केले. मात्र, त्याने अंदाधुंद गोळीबार सुरू केल्याने चकमक उडाली.

यानंतर झालेल्या प्रत्युत्तरात्मक कारवाईत एक पाकिस्तानी दहशतवादी ठार झाला. घटनास्थळावरून एके रायफल, पिस्तूल तसेच मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करण्यात आला असल्याची माहिती लष्कराने दिली. दरम्यान, परिसरात लष्कर आणि पोलिसांची संयुक्त शोधमोहीम सुरू असून संपूर्ण भागात ड्रोन आणि इतर तांत्रिक उपकरणांच्या मदतीने हवाई देखरेख ठेवण्यात येत आहे.

## मणिशंकर अय्यर यांचे स्पष्टीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी केलेल्या कथित जातीवादी वक्तव्यांबाबत माजी केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर यांनी स्पष्टीकरण देत आरोप फेटाळून लावले आहेत. आपल्या वक्तव्याचा संबंध पंतप्रधानांच्या जातीशी नसून त्यांच्या "चारित्र्याशी" होता, असे अय्यर यांनी स्पष्ट केले.

जयपूर येथे शनिवारी झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना अय्यर म्हणाले की, त्यांनी कधीही पंतप्रधानांना "नीच जात" असे संबोधले नाही. "मी त्यांना 'नीच जातीचा' माणूस म्हटले नव्हते. मी त्यांच्या चारित्र्याचा संदर्भ देत 'नीच प्रकारचा व्यक्ती' असे म्हटले होते. त्या दोन्ही गोष्टी पूर्णपणे वेगळ्या आहेत," असे त्यांनी सांगितले.

अय्यर यांच्या मते, त्यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आला आणि तो जाणीवपूर्वक जातीशी जोडला गेला. ते स्वतः ब्राह्मण असल्याने पंतप्रधानांनी त्या विधानाला जातीचा अपमान म्हणून सादर केल्याचा आरोपही त्यांनी केला. अय्यर यांनी "चहा विकणारा पंतप्रधान होऊ शकत नाही" असे आपण कधीही म्हटले नसल्याचा दावा केला. त्यांच्या मते, त्यांनी केलेली टीका पंतप्रधान मोदी यांच्या "इतिहासाच्या ज्ञानाच्या अभावावर" होती. ते म्हणाले की, त्यांनी काही ऐतिहासिक मुद्द्यांचा संदर्भ देत प्रश्न उपस्थित केला होता. उदाहरणार्थ, अलेक्झांडर कधीही पाटलीपुत्रापर्यंत पोहोचला नव्हता, नालंदा भारतात आहे तर तक्षशिला सध्या पाकिस्तानात आहे, अशा ऐतिहासिक तथ्यांचा उल्लेख त्यांनी केला होता.

त्या चर्चेदरम्यान त्यांनी विनोदाने असेही म्हटले होते की, जर निवडणुकीनंतर मोदींना चहा वाटायचा असेल तर त्यासाठी व्यवस्था करता येईल. मोदींनी स्वतः सांगितले की ते चहा विक्रेते होते, असेही अय्यर यांनी नमूद केले. अय्यर यांनी मुस्लिमांबद्दल केलेल्या वक्तव्यांमुळे देशात जातीय व धार्मिक ध्रुवीकरण वाढल्याचा आरोपही पंतप्रधानांवर केला.

## नेपाळमध्ये बस दरीत कोसळली; सात भारतीय ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काठमांडू** : मध्य नेपाळमध्ये भारतीय यात्रेकरूंना घेऊन जाणारी एक प्रवासी बस डोंगराळ रस्त्यावरून घसरून दरीत कोसळल्याने सात जणांचा मृत्यू झाला, तर नऊ जण जखमी झाले. ही दुर्घटना शनिवारी रात्री घडली असून पोलिसांनी रविवारी याची माहिती दिली.

गोरखा जिल्ह्यातील जिल्हा वाहतूक पोलीस कार्यालयाचे प्रमुख सूरज अर्याल यांनी सांगितले की, मृतांमध्ये दोन महिला आणि पाच पुरुषांचा समावेश आहे. हे सर्व भारतीय नागरिक मनकामना मंदिरात दर्शनासाठी गेले होते.




जिल्हा पोलीस कार्यालयाचे प्रमुख भरत बहादूर बी. के. यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुथू कुमार (५८), अनामालिक (५८), मीनाक्षी (५९), शिवगामी (५३), विजयल (५७), मीना (५८) आणि तमिलारसी (६०) अशी मृतांची नावे आहेत. अपघातात बसमधील सात भारतीय यात्रेकरू जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच बस चालक आणि त्याचा सहाय्यक असे दोन नेपाळी नागरिकही या अपघातात जखमी झाले आहेत.

यात्रेकरूंनी मनकामना मंदिरात दर्शन घेतल्यानंतर बस परतीच्या प्रवासाला निघाली होती. मनकामना हे नेपाळमधील एक प्रसिद्ध हिंदू मंदिर असून भाविकांमध्ये अशी श्रद्धा आहे की येथे दर्शन घेतल्यास देवी मनोकामना पूर्ण करते. काठमांडूपासून सुमारे १२० किलोमीटर पश्चिमेला असलेल्या शाहिद लखन गावाजवळ हा अपघात झाला. बस उतारावरून जात असताना एका वळणावर चालकाचा ताबा सुटला आणि बस सुमारे १५० मीटर खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बसच्या अवशेषांमधून जखमींना बाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे स्थानिक रुग्णालयात पाठवले. मृतांच्या मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात येणार असून त्यानंतर ते कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात येतील, असे पोलिसांनी सांगितले.

नेपाळमध्ये डोंगराळ भौगोलिक परिस्थिती आणि अरुंद रस्ते यामुळे बस अपघातांची समस्या वारंवार समोर येते. अनेकदा रस्त्यांची खराब स्थिती आणि वाहनांची अपुरी देखभाल हीदेखील अशा दुर्घटनांमागील कारणे असल्याचे सांगितले जाते.

## दिल्ली-कोलकाता मार्गावरील सोन्याची तस्करी उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) दिल्ली आणि कोलकाता दरम्यान कार्यरत असलेल्या एका संघटित सोन्याच्या तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी सुमारे १४.१३ कोटी रुपये किमतीचे सोने, चांदी आणि भारतीय चलन जप्त केले असून सहा जणांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई सीमाशुल्क कायदा, १९६२ अंतर्गत करण्यात आली असल्याची माहिती डीआरआयने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे १३.४१ कोटी रुपये किमतीचे ८,२८६.८१ ग्रॅम सोने आहे. याशिवाय सुमारे १९.६७ लाख रुपये किमतीची ७,३५०.४ ग्रॅम चांदी आणि ५१.७४ लाख रुपयांचे भारतीय चलनही जप्त करण्यात आले आहे.

डीआरआयला मिळालेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तस्करी केलेले सोने रेल्वेमार्गे कोलकाताहून नवी दिल्लीला आणले जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार डीआरआयच्या पथकाने नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर सापळा रचला आणि कोलकाताहून आलेल्या एका प्रवाशाला रोखले.

तपासणीदरम्यान त्या व्यक्तीकडे परदेशी मूळचे सोने आढळले. हे सोने स्थानकाबाहेर थांबलेल्या एका व्यक्तीकडे सुपूर्द करण्याची त्याची तयारी होती. त्यानंतर सोने आणणारा आणि ते स्वीकारणारा अशा दोघांनाही घटनास्थळी अटक करण्यात आली.

दोघांची चौकशी केल्यानंतर तपासाचा धागा दिल्लीतील इतर ठिकाणी पोहोचला. डीआरआयने शहरात चालणाऱ्या एका बेकायदेशीर सोन्याच्या वितळवणाऱ्या युनिटचा शोध लावला. येथे सोने वितळवून त्याची ओळख बदलली जात होती आणि नंतर ते देशांतर्गत बाजारात पाठवले जात होते.

## एनडीएचे संख्याबळ वाढण्याची शक्यता

# राज्यसभेसाठी आज मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राज्यसभेच्या ३७ जागांसाठी १६ मार्च रोजी निवडणुका होणार असून, या पार्श्वभूमीवर सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) वरिष्ठ सभागृहात आपले संख्याबळ आणखी मजबूत करण्याच्या स्थितीत असल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या वर्षभरात विविध राज्यांतील राजकीय घडामोडींमुळे बदललेल्या समीकरणांचा फायदा एनडीएला या निवडणुकांमध्ये मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या राज्यसभेत भारतीय जनता पक्षाकडे १०३ जागा आहेत, तर एनडीएचे एकूण संख्याबळ २४५ सदस्यीय सभागृहात १३३ इतके आहे. पक्षाच्या सूत्रांच्या मते, या निवडणुकांमध्ये एनडीए ३७ पैकी सुमारे २१ ते २२ जागा जिंकू शकते. तसे झाल्यास राज्यसभेत एनडीएची एकूण ताकद १४० च्या आसपास पोहोचण्याची शक्यता आहे. यामुळे उर्वरित कार्यकाळात सरकारचे विधेयक मंजूर करण्यातील प्रभाव वाढू शकतो.



या निवडणुकीत बिहारकडे विशेष लक्ष लागले आहे. राज्यात मुख्यमंत्री नितीश कुमार पुन्हा एनडीएसोबत आल्याने विधानसभेतील संख्याबळ एनडीएच्या बाजूने आहे. बिहारमधून राज्यसभेसाठी पाच सदस्यांची निवड होणार आहे. एनडीएने या सर्व पाच जागांसाठी उमेदवार उभे केले असून त्यामध्ये भाजपचे दोन, जनता दल (युनायटेड) चे दोन आणि मित्रपक्ष उपेंद्र कुशवाह यांचा एक उमेदवार आहे.

राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या उमेदवारीमुळे राज्यात भविष्यातील नेतृत्वबदलाबाबत चर्चा सुरू झाली आहे. काही विश्लेषकांच्या मते, या घडामोडींमुळे राज्य सरकारमध्ये भाजपला अधिक प्रभाव मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

आसाम, ओडिशा, हरियाणा आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये एनडीएकडे संख्यात्मक ताकद असल्यामुळे त्या ठिकाणी युतीला फायदा होण्याची शक्यता आहे. मात्र, राज्यसभा निवडणुकांमध्ये अनेकदा क्रॉस-व्होटिंगचा घटक निर्णायक ठरू शकतो. त्यामुळे काही ठिकाणी निकाल अनपेक्षितही लागू शकतो.

दरम्यान, महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागा बिनविरोध निवडून आल्यामुळे तेथील निवडणूक प्रक्रिया आधीच पूर्ण झाली आहे. सत्ताधारी महायुती आणि विरोधकांमध्ये समझोता झाल्याने सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामुळे महाराष्ट्रातील जागांवर मतदानाची गरज भासली नाही. या घडामोडीमुळे राज्यसभेतील संख्याबळाच्या समीकरणावर काही प्रमाणात परिणाम झाला आहे.

## बंगाल निवडणुकीत भाजपची नवी रणनीती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने प्रचारासाठी नवी रणनीती आखल्याची माहिती समोर आली आहे. या रणनीतीनुसार पक्षाचे केंद्रीय नेते तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर थेट वैयक्तिक टीका टाळतील. मात्र राज्यातील तृणमूल काँग्रेस सरकारच्या कारभारावर ते जोरदार टीका करतील, अशी भूमिका भाजपने घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका लवकरच जाहीर होण्याची अपेक्षा आहे. त्याआधीच भाजपने प्रचाराची तयारी वेगाने सुरू केली असून पक्षाची पहिली उमेदवार यादीही जवळपास तयार झाल्याचे सांगितले जाते. कोलकात्यातील ब्रिगेड ग्राउंड येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मोठ्या सभेद्वारे भाजपने निवडणूक प्रचाराची औपचारिक सुरुवात केली. पक्षाच्या सूत्रांच्या मते, २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतील अनुभव लक्षात घेऊन भाजपने यावेळी प्रचाराचा सूर बदलण्याचा निर्णय घेतला आहे. त्या वेळी भाजपच्या काही नेत्यांकडून ममता बॅनर्जी यांच्यावर झालेल्या वैयक्तिक टीकेमुळे त्यांच्याविषयी सहानुभूतीचे वातावरण तयार झाले होते, असा पक्षाचा अंदाज आहे.

ममता बॅनर्जी यांनी स्वतःला 'दीदी' म्हणून जनतेसमोर मांडत भाजपच्या हल्ल्यांचा राजकीय फायदा करून घेतला, असे भाजप नेतृत्वाचे मत आहे. त्यामुळे यावेळी केंद्रीय नेते थेट व्यक्तीवर टीका न करता राज्यातील प्रशासन, कायदा-सुव्यवस्था आणि विकासाच्या मुद्द्यांवर भर देण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिगेड ग्राउंडवरील सभेतही ममता बॅनर्जी यांचे नाव थेट न घेता तृणमूल काँग्रेस सरकारच्या कारभारावर टीका केली. राज्यातील भ्रष्टाचार, कायदा-सुव्यवस्था आणि विकासातील कथित कमतरता यांसारख्या मुद्द्यांवर त्यांनी सरकारला लक्ष्य केले. भाजप सरकारविरोधी भावना अधिक प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

### कांशीराम यांना भारतरत्न देण्याची मागणी

**नवी दिल्ली** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बहुजन समाज पक्षाचे (बसपा) संस्थापक कांशीराम यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याची विनंती केली. कांशीराम यांना सक्षमीकरण आणि आशेचे प्रतीक म्हणून पाहणाऱ्या लाखो लोकांच्या आकांक्षांचा यामुळे सन्मान होईल, असे प्रतिपादन त्यांनी केले. कांशीराम यांनी भारतीय राजकारणाचे स्वरूप बदलले आणि त्यांच्या चळवळींद्वारे बहुजन आणि गरिबांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण केली.

## अभिनेता विजयची चौकशी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : करूर येथील चेंगराचेंगरी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) अभिनेता आणि तमिळगा वेत्री कळगम (टीव्हीके) प्रमुख विजय यांची रविवारी दिल्लीतील मुख्यालयात चौकशी केली. या प्रकरणात विजय यांची ही तिसरी चौकशी आहे.


यापूर्वी जानेवारीमध्ये त्यांची दोनदा चौकशी करण्यात आली होती. सीबीआयने विजय यांना ९ मार्च रोजी हजर राहण्याचे समन्स दिले होते; मात्र त्यांनी १५ दिवसांची मुदतवाढ मागितली होती. तसेच राजकीय व्यस्ततेचा हवाला देत चौकशी चेन्नई किंवा तामिळनाडूमधील कार्यालयात करण्याची विनंतीही केली होती. मात्र सीबीआयने दोन्ही मागण्या फेटाळून लावत त्यांना दिल्लीतील मुख्यालयातच हजर राहण्यास सांगितले. या प्रकरणात द्रमुकचे आमदार सेंथिल बालाजी यांनाही १७ मार्च रोजी चौकशीसाठी उपस्थित राहण्याचे समन्स बजावण्यात आले आहे.

## अकेंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक भूमिका

# अरवली टेकड्यांच्या व्याख्येसाठी उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अरवली टेकड्या आणि पर्वतरांगांची एकसमान व स्पष्ट व्याख्या तयार करण्यासाठी प्रस्तावित १० सदस्यीय उच्चाधिकार तज्ज्ञ समितीबाबत केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सकारात्मक भूमिका दर्शवली आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात या समितीच्या स्थापनेला कोणताही आक्षेप नसल्याचे स्पष्ट केले आहे.



मंत्रालयाने आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, केंद्रीय सक्षम समितीने सुचविलेल्या तज्ज्ञांच्या नावांवर केंद्र सरकारची हरकत नाही. तसेच सध्या या समितीत समाविष्ट करण्यासाठी मंत्रालयाकडे अतिरिक्त नावांची शिफारस नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रस्तावित समितीमध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात येणार आहे. या समितीच्या अध्यक्षपदी भारतीय वन संशोधन आणि शिक्षण परिषद यांच्या महासंचालक कांचन देवी यांची नियुक्ती प्रस्तावित आहे.

१९९१ च्या मध्य प्रदेश केडरच्या भारतीय वन सेवेतील अधिकारी असलेल्या कांचन देवी यांना वनीकरण संशोधन, वन्यजीव संरक्षण, वन धोरण आणि संस्थात्मक नेतृत्वाचा तीन दशकांहून अधिक अनुभव आहे. या समितीत भारतीय वन सर्वेक्षण, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण आणि सर्वे ऑफ इंडिया या संस्थांशी संबंधित माजी वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञांचा समावेश करण्यात येणार आहे.

समितीतील संभाव्य सदस्यांमध्ये भारतीय वन सर्वेक्षणचे माजी महासंचालक सुभाष आशुतोष, भारतीय भूगर्भ सर्वेक्षणचे माजी संचालक राजेंद्र कुमार शर्मा, हवामान व ऊर्जा धोरण तज्ज्ञ तेजल कानिटकर, जीवशास्त्र संशोधक जया प्रकाश यादव, भूगोलशास्त्रज्ञ तेजबीर सिंग राणा, भारताचे माजी अतिरिक्त सर्वेक्षक जनरल एस. व्ही. सिंग, गुजरातचे माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक सी. एन. पांडे आणि नागालँडचे माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक धर्मेंद्र प्रकाश यांचा समावेश आहे. याशिवाय केंद्रीय सक्षम समितीने पर्यावरण विषयावरील लेखक आर. एन. मिश्रा आणि पर्यावरणीय पुनर्संचयित व संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञ विजय धस्माना यांची नावेही समितीसाठी सुचवली आहेत.

पर्यावरण मंत्रालयाने न्यायालयात स्पष्ट केले की, अरवली टेकड्या आणि पर्वतरांगांशी संबंधित पर्यावरणीय, भूगर्भीय आणि भौगोलिक बाबींचा सखोल व विश्लेषणात्मक अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. या प्रक्रियेत विविध भागधारकांशी चर्चा करून व्यापक अभ्यास केला जाणार आहे.

यापूर्वी २६ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण मंत्रालय आणि इतर संबंधित पक्षांना अरवली पर्वतरांगांची स्पष्ट व्याख्या तयार करण्यासाठी तज्ज्ञांची नावे सुचवण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने असेही नमूद केले होते की, या भागात केवळ कायदेशीर खाणकामालाच परवानगी दिली जाईल. त्याआधी २९ डिसेंबर रोजी न्यायालयाने अरवली पर्वतरांगांच्या नव्या व्याख्येबाबत निर्माण झालेल्या वादाची दखल घेत २० नोव्हेंबरच्या आपल्या आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली होती. त्या आदेशानुसार अरवलीची एकसमान व्याख्या स्वीकारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, परंतु त्यावर अनेक पर्यावरणवादी व तज्ज्ञांनी आक्षेप घेतला होता.